
पांडुरंग सूर्यवंशी

# सोम्या आणि गोम्या



# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# सोम्या आणि गोम्या

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

**पण**

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

a

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# सोम्या आणि गोम्या

## एकांकिका नाटक

कै. पांडुरंग सूर्यवंशी

# सोम्या आणि गोम्या

**लेखक : कै. पांडुरंग सूर्यवंशी**

द्वारा- कुमुद्वती भोसले

प्लॉट नंबर 15, दिप सेवक सोसायटी, आर के नगर, कोल्हापूर .

संपर्क – व्हॉट्स ऍप क्र. ९९७०१०३३७८

Email : bhosalekumudwati@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकांच्या वारसाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी त्यांची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

his declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक: : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(For free ebooks send your name and place)


प्रकाशन : २० एप्रिल २०२३

©esahity Pratishthan®2023

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# कै. पांडुरंग देवाप्पा सूर्यवंशी

(जन्म -२३ जुलै.१९२६ मृत्यू -४ एप्रिल -१९७६.)



कवी व लेखक कै.पांडुरंग सूर्यवंशी यांचा जन्म-२३जुलै १९२६रोजी वडगांव, बेळगांव येथे झाला. कै. पांडुरंग सूर्यवंशी हे बेळगावचे सिद्धहस्त साहित्यिक आणि प्रतिभावान कवी होते .त्यांनी १९४८ते १९६५ या दरम्यान काही कविता ,एक खंडकाव्य, लघुनिबंध व नाटक लिहिले. त्यापैकी कथा व कविता प्रसिद्ध झाल्या. त्यांच्या पहिल्याच लघुकथेला पहिले बक्षिस मिळाले होते. त्यांच्या कविता अभिरुची आणि सत्यकथा या दर्जेदार मासिकातून अग्रक्रमाने प्रसिद्ध होत होत्या. 'तुला कोणती आणु वानगी', 'माऊली', 'अभिसार' या कविता 'अभिरुची'त गाजल्या होत्या. 'वैशाखाचे स्वप्न' हे खंडकाव्य शार्दुलविक्रीडित या वृत्तात लिहून त्यांनी 'अभिरुची' कडे प्रसिद्धिसाठी पाठविले होते. परंतु अभिरुची मासिक बंद पडले आणि ते खंडकाव्य अप्रकाशित राहिले .या खंडकाव्याचे वैशिष्ट्य म्हणजे कै. माधव जुलियन यांच्या ' विरहतरंग' नंतरचे त्या वृत्तात लिहिलेले मराठीतील

ते दुसरे खंडकाव्य होते आणि त्या खंडकाव्याचा  विषय हा अखंड आसामच्या डोंगराळ भागातील जनतेविषयी होता. रा. स्व. संघाचे ते निष्ठावंत कार्यकर्ते होते आणि संघाच्या नित्य कार्यामुळे त्यांच्याकडून विपूल साहित्य रचना झाली नाही. मात्र रा.स्व. संघाशी बालपणापासून संबंध आल्यामुळे त्यांच्या विचारात आणि शब्दात भावोत्कटता, लयबद्धता गतिमानता ओज व तेज हे गुण प्रकर्षाने जाणवत होते..

त्यांचे शिक्षण चिंतामणराव हायस्कूल, लिंगराज कॉलेज, लॉ कॉलेज आणि बी. टी. कॉलेज इथे होऊन त्यांनी 'एम. ए. एलएलबी. बी.एड. ' या पदव्या मिळवल्या होत्या. त्यानंतर चिंतामणराव हायस्कूल आणि नंतर सरदार्स हायस्कूलमध्ये त्यांनी शिक्षक म्हणून नोकरी केली. एक उत्तम  व शिस्तप्रिय शिक्षक म्हणून त्यांनी नांव मिळविले होते.शिक्षक असतानाच वयाच्या ४० शीत ते दीर्घकाळ असाध्य व्याधीने आजारी पडले आणि किट्स , शेले , बालकवी यांच्याप्रमाणे साहित्यिक क्षेत्रात नाम कमावण्याची प्रतिभा असून सुद्धा सगळेच व्यर्थ गेले. साधारण साडेअकरा वर्षे ते अंथरुणाला खिळून होते.नंतर वयाच्या अवघ्या ५० व्या वर्षी म्हणजे ४एप्रिल १९७६ मध्ये ते वडगांव येथील आपल्या घरी निधन पावले.त्यामुळे त्यांचे सगळे साहित्य अप्रकाशित राहिले. कॉलेजमध्ये डॉक्टर ग्रामोपाध्ये, ,

डॉ.वि.म.कुलकर्णीआणि कविमित्र शांताराम रामचंद्र यांच्या सहवासात राहून त्यांनी वाङमय प्रकाश मंडळातर्फे' नवधारा 'हा प्राथमिक काव्यसंग्रह आचार्य अत्रे व ग.त्र्यं माडखोलकर यांच्या उपस्थितीत बेळगांवच्या साहित्य संमेलनात प्रसिद्ध केला. या कविता संग्रहामध्ये देखील त्यांनी लिहिलेल्या चार ओळींची 'भाव कणिका' गाजली.

पांडुरंग सूर्यवंशी यांनी संत ज्ञानेश्वरांच्या जीवनावर आधारित लिहिलेले तीन अंकी नाटक 'माझा मराठाची बोलु' हे  अप्रकाशित राहिले होते.ते 'वीरवाणी '१९९७ च्या दिवाळी अंकामध्ये प्रसिद्ध झालेले आहे."हे नाटक वैशिष्ट्यपूर्ण लिहिले आहे" असे प्रसिद्ध कादंबरीकार 'ना. सि.फडके' यांचा अभिप्राय असलेली टिपणी त्यांच्या हस्तलिखितावर आहे.

तसेच त्यांनी 'प्रक्षोभ' नावाचे १८५७ च्या स्वातंत्र्य लढ्यावर आधारित एक अभ्यासपूर्ण नाटक लिहिलेले  आहे .ते दोन ऑगस्ट २०२२ रोजी www.esahity.com या वेबसाईटवर प्रकाशित झालेले आहे.

या व्यतिरिक्त 'चंद्रहास'हा त्यांचा काव्यसंग्रह ही आजारपणामुळे अप्रकाशित राहिला.यामध्ये त्याकाळी प्रसिद्ध झालेल्या काही

a

प्रकाशित कविता आहेत.व बाकीच्या अप्रकाशित कविता दोन्ही मिळून 'चंद्रहास 'काव्यसंग्रह प्रकाशित करत आहोत.वयाच्या २१/२२ व्या वर्षापासून त्यानी कविता केलेल्या दिसतात.

'हरपला पोलादी पुरुष ' ही कविता सरदार वल्लभभाई पटेल यांच्यावर त्यांच्या मृत्यूनंतर लिहिलेली आहे ती १८डिसे. १९५०साली 'प्रेरणा' साप्ताहिकात प्रसिद्ध झाली आहे.

'अंदमानातून' ही कविता सावरकरांवर त्याना अंदमानातील तुरुंगात शिक्षा दिल्याबद्दल लिहालेली आहे. ती २६ एप्रिल १९४६ रोजी ' संधि ' प्रातिनिधिक कविता संग्रहात प्रकाशित झाली आहे.

तसेच इतर काही कविता - 'कोष आता फोडिला हा,' 'प्रवासी', 'स्वप्नामागें ', 'संभवते तरि का-'. ,'परि आज ' , 'हिंदोळयावरची आस',. 'त्या सुंदरतेस्तव फिरतो-', ' असे आमुचा हाच संसार गे' , 'उभय ध्रुवांच्या मध्यावरतीं ', 'मानवता ', 'हीच वांछा खुळी! ', 'या रंगभूमिवर ', 'काजवेच!...काजवेच!!' , 'आरती ओवाळणे ही-,'

'मी हिन्दु. .....', ' माझा धर्म निराळा-', 'हा जीवनपथ', ''मन,श्रद्धा,बुद्धीपुन्हा निराश्रित झाली!', 'स्वप्नानी सखि निशा बहरली', तसेच 'भारताची भूपाळी ' या व अशा काही प्रकाशित कविता वेगवेगळया मासिकातून प्रसिद्ध झालेल्या आहेत.आता एकुण

१०० वर कविता चंद्रहास मासिकातून प्रसिद्ध व्हायच्या आहेत.त्यासाठी प्रयत्न चालू आहेत.

तसेच वर उल्लेख केलेले 'वैशाखाचे स्वप्नं'हे खंडकाव्य शार्दुल-विक्रीडित या अक्षरगण वृत्तात लिहिलेले म्हणजेच चार ओळीचे एक कडवे व प्रत्येक ओळीत १९अक्षरे याप्रमाणे ३१६ कडवी असलेले हे खंडकाव्य'लवकरच प्रसिद्ध करण्याच्या प्रयत्नात आहे.

'कवचकुंडले' नावाची लघुकथा अप्रकाशित आहे. त्याचप्रमाणे एक ऐतिहासिक नाटक शिवाजी महाराजांवर लिहायला घेतले होते पण दुर्दैवाने ते अर्धवट राहिले आहे.त्याचप्रमाणै सोम्या आणि गोम्या नावाची विनोदी एकांकिका १६/८/१९५६ ला लिहिली आहे. ती अप्रकाशित आहे. ते जर आजारी पडले नसते तर आता एक नावाजलेले लेखक, नाटककार,कवि व  कथाकार म्हणून चिरपरिचित असते.इथे नशिबानी त्यांना साथ दिली नाही असेच म्हणावे लागेल.

संपर्कासाठी पत्ता-

सौ.कुमुद्वती राजेंद्र भोसले

कोल्हापूर.

फोन नंबर-९९७०१०३३७८.

a

**—-------------------------------**

**सोम्या आणि गोम्या**

एकांकिका

लेखक -**पांडुरंग दे.सूर्यवंशी**

-------------------------

**( मुंबईतील एक चाळ**

**स्थळ -एक खोली**

**वेळ:- सकाळची**

**चंदनमल्ल मारवाडी प्रवेश करतो)**

**चंदनमल्ल—--- (स्वगत )** पैशा मिलवायच्या तो आमी मारवाड्यांनीच! अरे, ये लोक कशला पैशा मिलवते? आता आमीच बघ नी! ह्ये मुंबईमा एवढी मोठी चाल बांधून ठेवली! पन एकाच खोलीला डबल भाडा मिलवायची शक्कल दुसऱ्याला येल काय? त्ये शाला सोम्या कापशे, निशता खिला जुलवते- कंपाझिटरचा काम रात्री छापखान्यात करते आणि दिवशा कुठे खोलीमंदी येते. आणि ह्ये गोम्या तापशे एका टोपीवाल्याच्या दुकानमंदी दिवशा नोकरी करते आणि रात्री त्येच खोलीमंदी झोपायला येते. दोघबी समजते आपणच एकटा खोलीत रहाते. आणि मला तर डबल भाडा मिलते! (खुशीत) वारे माझे मारवाडी डोका! डोका अशावा तर अशा!! (चाहूल घेऊन ) हां! गोम्या तो आला .हे आता निघायची तयारी करते हाय अशा दिसते .

**(हातात आरसा आणि फणी घेऊन गोम्या प्रवेश करतो. आरशात पाहून आपले आखुड केस विंचरण्याचा निष्फळ प्रयत्न करतो. त्याचा चेहरा त्रासिक होतो** )

**चंदनमल्ल—----** जय गोपाळ, गोमाजी राव!

a

**गोम्या—---** कोन? चंदनमलशेठ? नमस्ते!

**चंदनमल्ल—----** काय झ्याली तय्यारी जायाची?

**गोम्या** —-- चालली आहे. साताला निघालंच पाहिजे ना! नाहीतर आमचा मालक चांगलं तेल लावून (कृती करतो) करतो वेळ झाला म्हणजे!

**चंदनमल्ल**—-- अहो मालक पैशा देते! मग काम चोख झालाच पाहिजे!!

**गोम्या —---** पण पैसे दिले म्हणजे काम चोख होतच असं कुठे आहे? माझ्याच डोक्याकडे पहा ना! कालच रात्री येता येता हजामत करून घेतली! हजामाला काय खडे दिले मी हजामतीबद्दल?

**चंदनमल्ल —---.** का? काय झाला हो?

**गोम्या** **—----** काय, काय? जन्मात हजामत करून घेणार नाही आता! हजाम साला! बेट्याला केसांची टोकं छाट म्हणून सांगितलं तर नुसती टोकं

a

शिल्लक ठेवली डोक्यावर! साल्याला डोकं असेल तर! केसांची टोकं म्हणजे केसांची कवटीत रुतलेली टोकं वाटली बेट्याला!

**(गोम्या आरसा आणि फणी रागाने फेकून देतो** )

**चंदनमल्ल**—---. (**हसत**) ह्यॅS ह्यॅ S ह्यॅ! शाला हजामच हाय झाला! बरां, बाकी कसा काय ठीक हाय ना?

**गोम्या** —--(**चिडक्याच स्वरात** ) ठीक? अं? तुम्ही सुद्धा या खोलीला भाड्याचे पैसे घेताच ना?

**चंदनमल्ल —---** मग काय फुकट द्येल खोली?

**गोम्या —---** फुकट मागितली असती तर जीव गेला असता तुमचा! पण खोली चोख ठेवण्याचीही जबाबदारी तुमचीच असते ना?

**चंदनमल्ल—----** हां! मग काय च्यांगली ठेवली नाय खोली?

a

**गोम्या —----** तशी खोली 'च्यांगली' आहे ही! पण इतक्या थोड्या भाड्यात हे एवढे जमिनीवरचे खड्डे देणं तुम्हाला कसं काय परवडतं बुवा?

**चंदनमल्ल —---**हे खड्डे काय फार ------.

**गोम्या —---- (त्याला अडवून)** नाही, नाही. तसे खड्डे काही फार नाहीत म्हणा हे! खड्ड्याच्या या कलाकुसरीतून सपाट जमीन शोधावी लागते, इतकेच फक्त!! जमिनीवर आडवं व्हायचं म्हणजे खड्ड्यातच निजावयाचं! फार काही नाही!

**चंदनमल्ल**—-- पण हे खड्डे बुजवायचे म्हणजे आमी खड्ड्यात पडायचा झाला! तरी बी हे जल्मी आमी लवकरच दुरुस्ती करेल बरा!

**गोम्या** —-- आणि काय हो चंदनमल्ल! मी तर कोळसा फार थोडा वापरतो पण कोळसा कसा काय लवकर खलास होतो हो?

**चंदन —----** म्हंजे, आम्ही कोळसा चोरते काय?

**गोम्या** —-- तसा माझा मतलब नाही हो! पण नुसताच कोळसा लवकर खलास होत नाही. त्याबरोबर साखरेचाही साठा लवकर फस्त होतो!

**चंदनमल्ल—---.** म्हणजे आमी तुमची साखरबी च्योरते अशा तुमी म्हनते?

**गोम्या** —-- तसं नाही हो! पण मांजर चोरतं म्हणावं, तर ते फार तर दूध चोरील ; दूध चोरल्यावर त्यात साखर घालून ते खरपूस तापवून पितं असं कसं म्हणावं?

**चंदनमल्ल** —-- ह्यॅ S ह्यॅ S ह्यॅ तुमी तो भारी विनोद करते बुवा!

**गोम्या —----. (जाण्याची सर्व तयारी होते. गडबडीने बाहेर जात)** बरं आहे चंदनमल्ल .जातो मी आता! सात वाजत आले! जमल्यास तेवढी खाट बदलून टाका बुवा! ढेकणांनी नुसत्या निर्वासिताच्या सारख्या वसाहती बसविलेल्या आहेत! पाठीची अक्षरशः कमान करून झोपावं लागतं तिथं! येतो रामराम!

**चंदनमल्ल**—-- जय गोपाळ! जय गोपाळ! या! (**गोम्या जातो** ) आता इतक्यात सोम्या येयाची वेळ तो व्हईल! तवा सोम्याचा सामान च्यांगला नीट ठेवायला पाहिजे!आणि गोम्याचा सामान उचलून ठेवायला पाह्यजे!

( **गोम्याच्या वस्तू इकडे तिकडे लपवून ठेवतो आणि सोम्याच्या वस्तू बाहेर काढून ठेवतो**.) श्याला हे तो जबरदस्त काम हाय! पण डबल भाडा मिलवायचा तो हे केलाच पाहिजे!

( **पडद्यात जिन्यावर पुढचा संवाद सुरू होतो .तो ऐकत ऐकत काम उरकतो**.)

**गोम्याचाआवाज**—---- का हो सरदारजी?

**सोम्याचा आवाज** —---- का हो तिस्मारखा◌ँ◌ं?

**गोम्याचा आवाज** —-- दिसत नाही का तुम्हाला? धक्का दिलात की! नीट जिना चढता येत नाही की काय?

a

**सोम्याचा आवाज** —--- तुम्हालाच दिसतं की नाही? तुम्हीच आदळळलात की! आणि वर मला धमकी?नीट जीना उतरता येत नाही काय तुम्हाला?

**गोम्याचा आवाज —----** अरे वा!चोर तो चोर आणि वर शिरजोर! उलट्या बोंबा मारतो काय लेको?

**सोम्याचा आवाज—----.** मी चोर काय रे मवाल्या? अं? आता जातोस मुकाट्याने का देऊ?

(**खोलीत सोम्या प्रवेश करतो** )

**सोम्या —----. (रागारागात)** अहो चंदनमल्ल, कोण हो तो मवाली? चांगलं थोबाड फोडलं पाहिजे त्याचं!

**चंदनमल्ल—---- ( गडबडीत** ) कोण म्हटला?

a

**सोम्या** —---- तो हो तो! मी नेहमी जिना चढून येताना गडबडीन खाली धडपडत जातो तो!

**चंदन —----.** हा, हा, तो होय! तो - तो वरच्या मजल्यामदी राहतो तो माणस्!

**सोम्या** —----. हा, हा! तो चोर साला होय? तो कोणी टोपी- विक्या दिसतो! दररोज त्याच्या डोक्यावरची टोपी बदललेली असते! बहुदा कुठेच न खपणाऱ्या टोप्या घालत असावा लेकाचा!

**चंदनमल्ल—----** हां!हां! अशल!अशल! बाकी तुमच्या सगळा ठीक हाये ना? काय पाहिजे काय तुम्हाला?

**सोम्या** —----. (**रागाने केसओढीत**) एक बंदूक द्या किंवा तलवार तरी द्या!

**चंदनमल्ल** —----. (**घाबरून)** बंदूक?तलवार? (**अतिशय घाबरून)** मने पानी आपो!! (**पडू लागतो** )

a

**सोम्या** —----. (**त्याला सावरून**) अरे तुम्हाला मारायला नाही मागत मी! त्या टोप्या बदलणाऱ्याच डोकं उडवायला मागतो आहे मी!

**चंदन** —----. (**आवंढा गिळीत**)हां.हां.ठीक. पन ते तो गेला बाहेर!!

**सोम्या** —----. **(रागाने)** मग तुम्हीही जा! चला, चालते व्हा!!

**चंदनमल्ल—----. (घाबरून जाऊ लागतो. जाता जाता** -) जय गोपाळ! जय गोपाळ!

**सोम्या—----** थांबा! इथं या खोलीत कसला धूर रेंगाळतो आहे हा?

**चंदनमल्ल—----.** ( **थांबून** ) हा धूर होय? अशेल झ्याला लाकडाचा?

**सोम्या** —---- नाही .तसल्या धुराबद्दल म्हणत नाही मी! इथे सिगारेट नुकतीच ओढली गेल्यामुळे तंबाखूच्या वासासहित रेंगाळणारा धूर आहे हा!

a

**चंदनमल्ल—----** म्हणजे आमी सिग्रेट ओढते काय?

**सोम्या** —---- तुम्ही ओढत नाही तर हा धूर इथे कसा? नुकतीच सिग्रेट ओढली गेली असली पाहिजे इथे!

**चंदनमल्ल—----** ते वरच्या माळ्याच्या खोलीत ते आदमी राहते ना! ते सिगरेट ओढते त्याचा हा धूर!

**सोम्या —----** धूर तर नेहमी खालून वर जातो ;आज हा धूर वरून खाली उतरायला शिकतो आहे वाटतं!

**चंदनमल्ल**—---- ते आमाला काय कळणार? बरा तर येतो आमी! जय गोपाळ, जय गोपाळ!

**(चंदनमल्ल जातो)**

**सोम्या —----. (हसत** ) काय बेअकली आहे हा मारवाडी! बरं SS! ते जाऊ द्या आता! अंग कसं आंबून निघालं आहे. आता थोडसं खाटेवर

a

झोपावं झालं! खाटेवर काय झोपण्याची छाती आहे म्हणा? **(टायपाचे खिळे भरलेल्या पेटाऱ्याप्रमाणे ढेकूण नुसते बुचबुचलेले आहेत तिथं! त्यापेक्षा आतल्या बाजूला जमिनीवरच झोपावं झालं! पण जमीन तरी काय आहे म्हणा! खड्डेच कंपोज केले आहेत जसे काही! मधून मधून सपाट जमिनीच्या स्पेसा टाकल्यात म्हणून तिला जमीन म्हणायचं, एवढेच काय ते! पण या ढेकणाच्या टाचण्या मारणाऱ्या यंत्रापेक्षा जमिनीच्या स्पेसा टाकलेलं ते कंपोझिंग पुरवलं**!) पण कुठं झोपायचं ते नंतर पाहू!! थोडी काहीतरी न्याहारी केलीच पाहिजे आधी. त्याशिवाय स्वस्त काही झोप येणारच नाही! झक्कासपैकी ताजी अंडी आणि ताजा लुसलुशीत ब्रेड आणला आहे .अंडी उकडूया आणि मग ब्रेड बरोबर खाऊ, म्हणजे मग ताणून दिल्यास सुंदर काम होईल! (**पण अगोदर ब्रेडवर ताणून देऊ या की बिछान्यात ताव मारू या? चुकलो ; चुकलो! अगोदर बिछान्यात ताणून देऊया की ब्रेडवर ताव अगोदर मारू या?अं? कसं? छान!अगोदर ताणून देऊ! तोपर्यंत अंडी उकडत टाकू! आणि मग जाग आल्यावर ब्रेड, लोणी आणि उकडलेली अंडी खाऊ, म्हणजे मजा येईल! पुन्हा मग निर्धास्त**) (**भांडे हातात घेत** ) यथेच्छ झोप काढता येईल.

**(भांडे नाका जवळ नेतो. एकदम तोंड वेडेवाकडे करून नाक दाबून धरीत)** शी: शी: शी:अ रे रे रे! या भांड्याला माशाचा कसा काय वास येतो बुवा! या भांड्यात मी नेहमी अंडी तर उकडतो!

(**ओळखून**) हां! असं तर नसेल? हा चंदनमल्ल मारवाडी माझ्या भांड्यामधून मासे शिजवून खात असला पाहिजे! नक्कीच खात असला पाहिजे; आणि ते ही माझ्याच खोलीत, माझ्याच शेगडीवर शिजवीत असला पाहिजे! तरीच माझ्या कोळशाचा स्टॉक असा जलद खतम होतो आहे!! आणि ही काड्याची पेटी सुद्धा का लवकर खलास होते, ते आता माझ्या आलं लक्षात!! काड्याची पेटी इथं वापरूनच्या वापरून वर यातील काड्याही छाट मारीत असला पाहिजे! चंदनमल्ल अगदीच काही बेअकली नाही तर! चला S आता है चोरपुराण राहू दे.! आधी पोटोबाची व्यवस्था करू आणि मग पाहू आजच्या पुरती एक काडी आणि थोडे कोळसे या मारवाड्या बोक्यानं शिल्लक ठेवले आहेत, हे त्याचे मोठेच उपकार म्हणावयाचे! (**भांड्यात अंडी उकडत घालून ते तो शेगडीवर ठेवतो** ) ही अंडी शिजेपर्यंत आता इथे थोडसं खाटेवर - नको, त्या खाटेची आठवण नको! आज जमिनीवरच लवंडाव झालं! चला, आडवे व्हा सोमाजीराव अंडी उकडेपर्यंत! (**हे वाक्य उच्चारित आत जातो. आतून जांभई देतो. चुटकी वाजवून झोपी जा**तो)

a

**( दोन-तीन मिनिटांनी गोम्या अगदी खुशीत नाचत नाचत येतो)**

**गोम्या** —----. **(गुणगुणत चुटकी वाजवीत)** आला खुशीत समिंदर! त्याला नाही धीर! होडीला बघतो धरु! ग सजणे होडीला बघतो धरू! (**त्याच ओळी शीळ वाजवून घुमवितो**.) वा! काय दैव आहे? अंधळा मागतो एक डोळा तर दैव देते दोन!! आज अर्ध्या दिवसानंतर मालकाकडे सुट्टी मागावी म्हणत होतो! सदोबा पाटलाच्या सखू बरोबर राणीच्या बागेत तेवढंच फिरायला जायचं होतं मला! पण दैव असावं तर असं! मालकाकडे जाऊन अर्ध्या प्रहरासाठी सुद्धा तोंड पसरावं लागलं नाही ते नाहीच ; पण आजचा सबंध दिवस सुट्टी घे असं गेल्याबरोबर मालकाने सांगितलं!आणि वर मजा कर म्हणून हे पाच रुपयेहि हातावर ठेवले त्यानं! शेटजीला नवसासायासानं आज बारा वर्षानंतर मुलगा झाला आणि आम्हाला सुट्टी मिळाली, वर पाच रुपये मिळाले!शेटजीला असा दररोजच एक एक मुलगा झाला तर काय मौज येईल माझ्या आयुष्याला! दररोज सुट्टी! दररोज पाच रुपये! दररोज राणीचा बाग!!! आणि दररोज सखू!!!! आज मी मासे आणले येताना! सखुच्या संगतीत माशांच्या आमटी शिवाय मौज नाही! काही मासे तळूनही घेतले पाहिजेत! सखूच्या तोंडात तळलेल्या माशाचा घास! अहाहा, अशी काय खुश होईल सखू!अशी काय गोड हसेल! वा रे, वा!! आला खुशीत समिंदर, त्याला नाही धीर, होडीला बघतो धरू! ग सजणे (**एकदम**

**आश्चर्याने**) अरे! पण ही शेगडी कुणी पेटवली आहे?आणि आं?( **वाकून पाहून** ) माझ्या भांड्यात ही अंडीहि कुणी उकडत ठेवलेली आहेत का? भले मारवाड्या! छान अक्कल लढविली आहेस हं!माझ्या शेगडीवर, माझ्या कोळशांनी, आणि माझ्या भांड्यात तुझी न्याहारी उकडून घेतोस काय? मी गेल्यावर माझ्या मागे तुझे हे उद्योग चालतात वाटतं! आज तू नक्कीच येशील हाताला! आणि अंडी खायला शिकलास काय मारवाड्या? मुलखाचा कवडी चुंबक तू! एवढा अंड्याचा खर्च तरी कसा तुझ्या खिशातून बाहेर पडतो? छे असं कुठे झालं आहे? ही अंडीसुद्धा तू चोरूनच आणित असला पाहिजेस दुसऱ्या भाडोत्र्यांच्या घरून! आता ये आज इथं अंडी उकडलेली पाहायला! मला पाहून तूच उकडून निघशील की नाही ते मी पाहतो! चला पडा रस्त्यात मारवाड्याच्या अंड्यांनो! (**अंडी खिडकीतून रस्त्यावर फेकून देतो** ) आता मी माझे मासे शिजवतो!

(**भांड्यात मासे घालून भांडे शेगडीवर ठेवतो**) माशानो मस्त उकडून निघा! माझ्या सखूच्या तोंडाला झक्क चव आली पाहिजे!!चला! तोपर्यंत इतर सारी तयारी करण्याच्या कामाला लागू! कॅमेरा लोड केला पाहिजे! समोरच्या दुकानातून फिल्मआणलीपाहिजे!आज सखूचे पोजमध्ये फोटो काढायचेत मला! तीनंही कबूल केलं आहे!(**स्वप्नाळूपणे** )माझी सखू!!

a

**(दुसऱ्या दरवाजातून बाहेर जातो दरवाज्याचा त्याच्यामागे धडकन आवाज होतो त्या आवाजाने सोम्या जागा होतो)**

**सोम्या—----.** (**लगबगीने डोकावून**) कोण? चंदनमल्ल?(**ओरडून**) चंदनमल्ल काय? कसला आवाज झाला हा? खराच आवाज झाला की नुसताच झोपेतला भास?अं? काही तरी भासच असेल झालं! चला SS! उठलो ते एका दृष्टीने बरच झालं! नाही तर किती वेळ झोपलो असतो कोण जाणे! एव्हाना अंडी अगदी उकडून तयार असतील! (**शेगडी जवळ जाऊन भांड्यात डोकावून पाहत**) आं? (**बुचकळ्यात पडून**) अंडी काय झाली या भांड्यातली? आणि हे काय? मासे? अंडी उकडल्यावर त्यातून मासे बाहेर पडू लागले वाटतं अलीकडे? ठीक!

( **चिडून** ) आता आलं लक्षात! हा त्या चंदनमल्ल मारवाड्याचाच उद्योग! मारवाड्या मासे सुद्धा खायला शिकलास ना? पण हे मासे तूच विकत घेतलेस की कुणाकडचे चोरूनच आणलेस? सगळाच मामला चोरीचा म्हणून म्हणतो! मासे खायचे ते जर चोरूनच खायचे तर विकत कुठून आणणार तू? असले मासे तू चोरलेल्या कोळशावर शिजवून घेतोस यात काही नवल नाहीच आता! थांब, खायला ये आता चोरीचे मासे! (**मासे खिडकीतून बाहेर फेकून देतो** ) पडा रस्त्यावर मारवाड्याच्या माशांनो!

**( एवढ्या वेळात गोम्या हातामध्ये मोकळा जेवणाचा डबा, मोकळा थर्मास, लोड केलेला कॅमेरा इत्यादी वस्तू घेऊन बाहेरून येत असतो. बरोबर त्याच्या डोक्यात मासे आणि पाणी पडलेले असते.एक मासा त्याच्या टोपीवर अलगद पडून असतो. अशा अवतारात तो आत प्रवेश करतो .)**

**गोम्या** —---- शी :शी :शी: काय बेवकुफ आहेत या मुंबईतल्या बायका! कुण्या गरतीनं आम्हाला स्नान घातलं कुणास ठाऊक! (**एवढ्यात त्याच्याकडे आश्चर्याने पाहणाऱ्या सोम्याकडे लक्ष जाऊन**) अरे! हा कोण मवाली इथं! (**ओळखतो ;पण मुद्दाम)** कोण रे तू?

**सोम्या—----. (तो ही मुद्दाम**) तू कोण रे?

**गोम्या —----** मी विचारतो त्याचं आधी उत्तर दे! कोण तू?

**सोम्या** —---- मी विचारतो त्याचे उत्तर दे आधी!तू कोण?

**गोम्या** —----. (**हातातल्या वस्तू रागाने टेबलावर आपटीत**) मी आहे आपला टोपी विक्या!

**सोम्या**—----. ( **तितक्याच बेताने हातातले भांडे टेबलावर आपटी**त). मी आहे आपला खीळे जुळाऱ्या!

**गोम्या—----** काय रे खिळे -जुळाऱ्या, तू इथं कसा?

**सोम्या** —---- काय रे टोपी विक्या, तू इथे कसा?

**गोम्या**—---- माझ्या प्रश्नाचे उत्तर आधी! - तू इथे कसा?तुझी खोली तिथं वरच्या माळयावर!!

**सोम्या** —---- माझ्या प्रश्नाचे उत्तर आधी! तू इथे कसा? तुझी खोली तिथे वरच्या माळयावर!!

a

**गोम्या** —---- माझी नाही तुझी! चंदनमल्लानच मला तसं कैकवेळा सांगितलं आहे!

**सोम्या—----** मग मला काही चंदनमल्लाच्या काकानं तसं सांगितलं नाही!तुझी खोली वर आहे हे मला सुद्धा चंदनमल्लानच कैकवेळा आहे!

**गोम्या—----** तुझी खोली कुठे का असेना! ही तुझी खोली नाही, एवढं मी जाणतो .ही खोली माझ्या ताब्यात आहे!

**सोम्या**—---- मलाही तुझ्या खोलीचा काही एक संबंध नाही. तुझी खोली मसणात का असेना! ही खोली माझ्या ताब्यात आहे!

**गोम्या** —---- थांब, तुला तसं नाही पटायचं! (**खिशातून भाड्याची पावती काढीत** ) ही पहा ही भाड्याची पावती. कालच मी भाडं भरलं आहे या खोलीचं! हा पहा खोलीचा नंबर २७ .

**सोम्या** —--- अं? पावत्याही बनावट बनविण्याचे तुझं कसब आहे तर! (**खिशातून भाड्याची पावती बाहेर काढून**) हा पहा माझाहि पुरावा. ही पावती, हा खोलीचा नंबर २७, ही मालकाची सही, ही कालची तारीख! कालच मी भाडे चुकते केले आहे!

**गोम्या** —--- पावत्या मी बनवतो की तू ? छापखान्यात बसल्या बसल्या हे खोटे उद्योग करतोस काय? खिळे जुळविणाच्या कलेच चांगलं सार्थक करतोस!!

**सोम्या—----** हा वाद तसा मिटणार नाही! थांब चंदनमल्ललाच हाक मारू आणि या गोष्टीचा एकदाचा सोक्षमोक्ष लावून घेऊ!

**गोम्या** —---- होऊन जाऊ दे!बोलाव त्याला!

**सोम्या** —---- मी का म्हणून बोलावू?तुला हवं असेल तर तूच बोलव!

**गोम्या—----** माझं काय घोडं थोडंच अडलंय? तुला हवं असेल तर तूच बोलव!

**सोम्या**—----. असं केलं तर? आपण दोघेही एकदमच त्याच्या नावाने हाका मारूया!

**दोघे** —---- जमलं! चला! (**एकापेक्षा एक अशा चढत्या सुरात**) चंदनमल्ल!चंदनमल्ल! चंदनमल्ल!

**(चंदनमल्ल घाबऱ्या घाबऱ्या पोटावर हात चोळी प्रवेश करतो)**

**चंदनमूल्ल**—----. ( **धावत धावत दोघांच्या भोवतींनं तो रिंगण धरतो आणि फिरता फिरता** ) अरे- अरे -अरे -- काय -काय-काय झ्याला?-झ्याला-? झ्याला-? (**पुन्हा एकदा तेच**) (**दुसऱ्या रिंगणानंतर सोम्या त्याच्या एका बकोटीला धरून त्याला खेचतो. लगेच गोम्या दुसऱ्या बकुटीला पकडून त्याला हिसका देतो. त्या दोघांना एके ठिकाणी त्या खोलीत पाहून चंदनमल्लचे डोळे पांढरे होण्याची वेळ येते)**

**सोम्या** —---. (**हिसका देऊन)** तुम्ही आम्हाला फसवलंत?

**गोम्या—----.** ( **हिसका देऊन**) तुम्ही आम्हाला फसवलं?

**सोम्या**—----. ( **पुन्हा हिसका देऊन**) तुम्ही चोर आहात!

**गोम्या**—---- (**पुन्हा हिसका देऊन**)!तुम्ही चोर आहात!

**सोम्या**—----. ही खोली कुणाची? माझी आहे ना?सांगा, माझी आहे म्हणून!

**चंदनमल्ल** —----- ही खोली माझी आहे!

**सोम्या** —---. (**हिसका देऊन**) माझी म्हणजे (**स्वत:कडे बोट करून**) माझी! मेरी! या पठ्याची!

**गोम्या** —---- थांबा ही खोली या गब्रूची ( **स्वत:कडे हात करून** ) आहे हे या उपटसुंबाच्या कानिकपाळी ओरडून सांगा! आहे ना माझी खोली?

**चंदनमल** —---- आहे

**गोम्या** —---. (**सोम्यास**) झालं?

**सोम्या—----** ( **वेडावून**) काय झालं? म्हणे झालं!! अरे नुसतं 'आहे' म्हणाले ते! कुणाची आहे, ते नाही सांगितलं त्यांनी!

**गोम्या** —---- सांगा हो आता स्पष्ट सांगा तसं! म्हणजे याच्या तोंडात खेटर बडवल्याप्रमाणे होईल!

**चंदनमल्ल**—---- खरं सांगू?

**दोघे** —----. हा अगदी खरं खरं ते सांगा!

**चंदनमल्ल**—----. ही खोली तुम्हा दोघाचीबी हाये!

**दोघे** —---- आं? ते कसे काय?( **दोघेही एकमेकांकडे पाहतात )**

**चंदनमल्ल**—----. आम्हाला जरा खुला तो सोडा म्हणजे दोघांनाबी सांगतो कशी ते!

**दोघे**—----. काय पळून तर जाणार नाही तुम्ही!

**चंदनमल्ल+-----** आम्ही पळून जाऊन काय करेल? ही खोली थोडीच पळवून नेल आम्ही!

**सोम्या**—---- अं? बरोबर **(त्याला सोडतो)**

**गोम्या—----** ठीक. **(त्याला सोडतो)**

**चंदनमल्ल**—---हां!आता आम्ही सांगेल! हे बघा, या खोलीत (**सोम्याला** )तुम्ही दिवसा सकाळी सात पासून संध्याकाळी सात पर्यंत असते; आणि तुम्ही (**गोम्याला**) रात्री साता पासून सकाळी सातापर्यंत असते. तवा मला वाटला तुमा दोघांनाबी ही एकच खोली चालेल. म्हणून हे खोली तुम्हा दोघांनाबी भाड्याने दिली .

**दोघे एकदम** —----.आणि डबल भाडं उपटलं!!

**चंदनमल्ल** —----. हा तेवडा माझा फायदा झाला! पन तुमचा नुकसान तो नाही झाला ना!

**दोघे** —---- अरे मारवाड्या!

**चंदनमल्ल**—----. हा डबल भाडा मी उपटला, पण आज तो सगळाच बँड बाजा वाजला!! आता असे करा; थोडा वेळ थांबेल तुमी तर आमी तुम्हाला एक नवीन खोली खाली करून देल! च्यालेल? मग तो वांदा मिटेल?

**दोघे** —---- च्यालेल! पण अगदी लवकर खोली तयार करा!

**चंदनमल्ल**—----. (**लुटुलुटु धावत जातो. जाता जाता**) हां, हां! ह्ये तो करतेच आता! (**जातो**) (**सोम्या- गोम्या एकमेकाकडे मारक्या म्हशीप्रमाणे पहात उभे राहतात. काही वेळाने गोम्या खोलीत जलद गतीने येरझाऱ्या सुरू करतो.)**

**सोम्या** —----. अहो मिस्टर! हा काही तालीम खाना नव्हे! आणि हे मैदान तर नव्हेच नव्हे! तुम्हाला वॉकिंगचा म्हणजे चालण्याचा व्यायामच करायचा असेल तर रस्त्यात जा! ही माझी खोली आहे .(**असे म्हणत म्हणत सोम्या खिडकी उघडून ठेवतो** )

**गोम्या** —---- आणि मिस्टर तुम्हाला मोकळी हवा पाहिजे असेल तर तुम्ही चौपाटीवर जा! तुम्हाला ही खिडकी उघडता येणार नाही! मला हवा सहन होत नाही! बंद करा ती खिडकी!ही खोली माझी आहे!(**असं बोलता बोलता गोम्या सिगारेट पेटवतो** )

a

**सोम्या—----**अहो, पानपट्टबिडीमाचिससिगरेट इथे सिगरेट ओढायची नाही! मला तो धूर सहन होत नाही! ही माझी खोली माझ्या मनाप्रमाणे दुसऱ्यांनी वापरली पाहिजे!

**गोम्या** —---- (**सिगारेटची धुम्रवले सोडून**) दोस्त! आता जरा आम्ही दोघेही शांत होऊन बघूया ना! आता नवी खोली रिकामी होणारच आहे; ती तयार झाल्यावर आम्ही भांडणार आहोत थोडेच! तेव्हा इथंच भांडण विसरून थोडीशी दोस्ती करूया! काय, कसं?

**सोम्या**—---- ठीक! मीही तेच सांगणार होतो! आता मी सुरु करतो म्हणजे झालं! हं, कसं काय दोस्त? ठीक आहे ना?

**गोम्या**—---- ठीक आहे माझं! तुझं कसं काय?

**सोम्या** —---- वा उत्तम! लग्न बिग्न झालय की नाही तुझं दोस्त?

**गोम्या**—---- लग्न नाही अजून; पण लवकरच होईल!

a

लग्नापेक्षा लव मॅरेजच होईल माझं!

**सोम्या** —---- लव्हमॅरेज? वा काँग्र ॅट्स !! ( **सोम्या हस्तालोंदनासाठी हात पुढे करतो** )

**गोम्या** —---- ( **जळत्या सिगारेट सकट हात पुढे करतो)** थँक्स!!

**सोम्या** —---- (**चटकन हात मागे घेऊन** ) पण तुझी ती सिग्रेट? थँक्स देतोस की हात भाजतोस माझा!

**गोम्या** —---- (**हसत**) अरे हो! सॉरी ( **सिग्रेट डाव्या हातात घेतो; मग shakehand करतात**) तुझं कसं काय? वाजलं आहे वाटतं तुझं?

**सोम्या**—---- छे रे! अजून वाजायचंय! बहुदा लवकरच वाजवायची वेळ येईल! माझा सुद्धा प्रेमविवाहच ठरेलशी गॅरंटी वाटते.

a

**गोम्या** —---- अरे वा! बहुत अच्छा! Congratulations. (**हस्तांदोलन करतात** ) तुझं भावी जोड -आयुष्य सुखाचे जावो अशी मी सदिच्छा प्रगट करतो!

**सोम्या** —---- थँक्स पण गड्या मला थोडी भीती वाटते. माझं जोड-आयुष्य सुखाचं होईलच अशी मला गॅरंटी वाटत नाही.

**गोम्या** —---- एक वर्षाची ही गॅरंटी तुझी कंपनी देत नाही?

**सोम्या** —---- कंपनीच तशी बेकार आहे!

**गोम्या** —---- मोठं शब्द -कोडच घालतो आहेस गड्या तू! अरे एक वर्षाची गॅरंटी कुठलीहि बेकार कंपनी देऊ शकते! तुझा तर प्रेमविवाह म्हणतोस तू!आणि वर लव्हमॅरेज बद्दल गॅरंटीही नाही म्हणतोस म्हणजे आहे तरी काय हे?अं?

a

**सोम्या** —---- (**हताशपणे**) तसेच आहे बाबा ते!माझी होऊ घातलेली भावी जोडीदारीण जरा एक कोडं आहे! तिचं माझ्यावर प्रेम असेलच असं काही छातीठोकपणे मला अजून तरी सांगता येत नाही!

**गोम्या**—---- म्हणजे तुझं प्रेम फिफ्टी पर्सेंट आहे वाटतं! म्हणजे फक्त तुझी बाजू तयार?

**सोम्या** —----- छे, छे!तसं नाही! पण माझी प्रिया माझ्यापेक्षा पैशावर अधिक प्रेम करणारी आहे! तेव्हा उद्या कोणी एखादा लखपति तिच्या मागे लागला तर ती त्याला लख्ख पती म्हणून स्वीकारील ;आणि माझ्या डोळ्यापुढे लख्ख प्रकाश पाडील!

**गोम्या** —---- काय बदमाश बाई आहे! ती बाई आहे की हैवान आहे?

**सोम्या** —---- आहे खरं ती कुणीतरी!

**गोम्या** —---- (**रागाने** ) पण आहे तरी कोण ती प्रेमाचा असा अनादर करणारी बेगुमान दुष्टा? सैतान?

**सोम्या**—----तिचं नाव आहे सखु.

**गोम्या** —---- **(एकदम चमकून)** सखु?

**सोम्या** —---- हो! का, एकदम चमकलास का?

**गोम्या------ (आपल्या नादात)** सदोबा पाटलाची सखू?

**सोम्या** —---- हो! तुला काय ठाऊक तिचा बाप?

**गोम्या** —---- मला काय ठाऊक? भले! तिचं तर माझ्यावर प्रेम आहे! ती तर माझी प्रिया आहे! तिच्याबरोबरच तर आज मी राणीच्या बागेत जाणार आहे! आमचं सगळं अगोदरच ठरलय! काय हलकट दगलबाज मनुष्य आहेस तू! माझ्या खोलीवर डोळा ठेवलास तो ठेवलास; माझ्या पोरगीवरही डोळा ठेवतोस म्हणजे काय?

**सोम्या** —---- अरे चोरा, तिला भूल घालणारा तूच तो दृष्ट, चांडाळ की काय? माझ्या खोलीत घुसलास तो घुसलास; माझ्या प्रेमातही घुशीसारखा घुसणार आहेस काय? थांब तुझं डोकंच उडवतो!(**ओरडून**) चंदनमल्ल अहो चंदनमल्ल अरे चंदनमल्ल्या!

**गोम्या** —---- थांब तुझा निकालच लावतो! (**ओरडून** ) चंदनमल्ल, अहो चंदनमल्ल, अरे चंदनमल्ल्या!

**चंदनमल्ल** —---- (**धावत येऊन रिंगण धरीत**) अरे ...अरे ....अरे-- काय... काय … ..काय...पुना....पुना...पुना….झ्याला....झ्याला.... झ्याला?(**थांबून त्या दोघांच्या तप्त मुद्रेकडे पहात**) खोली तैयार हाये!

**सोम्या** —---- तुझी खोली गेली मसणात! मला अगोदर बंदूक दे!

**चंदनमल्ल** —---- ( **घाबरून** ) पुना बंदूक? अरे बापरे!! अरे आता खोली तैयार हाये!

a

**गोम्या** —---- अरे तुझी मसण गेली खोलीत! मला अगोदर बंदूक मागते .

**चंदनमल्ल**—---- हाय रे राम गोपाल! तुम्ही बी बंदूक मागते? पण माझ्याजवळ तो एकीच बंदूक असते!

**सोम्या** —---- जा .तीच घेऊन ये अगोदर!

**चंदनमल्ल**—---- हां, हा! घेऊन तो येल ; पन हे एक पत्र आले हाय ते अगोदर पढा तो खरा! कुनाचे असते ते तो बघा! हा!

**गोम्या** —---- पत्र? आण, आण ते इकडं! ( **एकदम खसखन ओढून घेतो)**

**सोम्या**—---- ये, थांब, थांब! इकडं आण ते पत्र! कुणाचं आहे ते पाहू दे मला!! ( **झडप घालतो)**

**गोम्या** —---- (**त्याला दूर लोटीत**) थांब! मला वाचता येतं! मी अगोदर पाकिटावरचा पत्ता वाचतो.

**सोम्या** —---- तोच मी अगोदर वाचणार आहे! तुझं पत्र असेल तर मी ते तुला लगेच देईन!

**गोम्या** —---- पण मलाहि देता येते की तुझंच असलं पत्र तर!

**सोम्या** —---- पण तू टोपी विक्या! तुला काय वाचण्याची सवय आहे? खिळे जुळवून जुळवून कशी अक्षरे डोळ्यात बसली आहेत माझ्या! जेनू काम तेनु करे! आण ते इकडं!

**गोम्या** —---- ते काही नाही! मी हा असाच वाचणार. तू हव तर इथं उभा राहून वाच म्हणजे मी वाचता वाचता तुलाही वाचता येईल!

**सोम्या** —---- न खपणाऱ्या टोप्या वापरणारा तू! बराच headstrong आहेस रे!

**गोम्या**—---- ये जपून बोल! माझा धंदा काढण्याचं तुला कारण नाही!

**चंदनमल्ल**—---- अहो सोमाजी, तुम्ही बी काय भांडते? ते पत्र तो राहिला ना हातामंदीच! ते पत्र पढा पहिले!

**सोम्या**—---- बर ठीक आहे!चल ना, लाग वाचायला!

**(गोम्या पत्र वाचू लागतो त्याच्या मागून सोम्या टाचा उंचावून पत्राच्या पत्यावर पाहतो)**

**गोम्या** —---- गोमाजी तापसे

**सोम्या** —---- काय वाचतो? सोमाजी कापसे आहे तिथं!

**गोम्या** —---- ठेवलय; गोमाजी तापसेच आहे!

**सोम्या** —---- आलय! सोमाजी कापसेच आहे!

**गोम्या** —---- (**आवास चढवून**) गोमाजी तापशे!

**सोम्या** —---- (**आवाज चढवून)** सोमाजी कापसे!

**चंदनमल्ल** —---- तुम्ही आपल्याच नावानं काय हाका मारते! पत्र तो पहा!

**सोम्या** —---- अहो माझं पत्र याला का म्हणून वाचू देऊ? याला काय माती वाचता येतं!

**गोम्या**—---- अहो, खिळे जुळवता जुळवता याचे डोळे फिरले असावेत.!याला 'गो' च्या जागी 'सो' दिसतो आणि 'ता' च्या जागी 'का'- दिसतो

**सोम्या** —---- छे! असं कधीच होणार नाही. अक्षरं माझ्या डोळ्यात बसलीत अगदी .

a

**गोम्या** —---- अक्षर बसलीत की अक्षर पाहून पाहून डोळे बसलेत देव जाणे!

**चंदनमल्ल** —---- मी सांगू! गो- सोमाजी का- तापसे असे समजा. दोघांचेबी पत्र समजा . पाकीट फाडून आतमंदी काय असे ते तो बघा!

**सोम्या** —---- बरं तसं करू! पण पाकीट फोडणार मी!

**गोम्या** —---- पुन्हा तु मी करण्यापेक्षा असं करू ;मी पाकीट फोडताना तू माझ्या हाताला हात लाव म्हणजे झालं!

**सोम्या**—---- बरं चला! **(गोम्या पाकीट फोडतो ते उघडताना सोम्या त्याच्या हाताला हात लावतो. ते पत्र दोघेही हातात धरतात.व दोघेही वाचू लागतात)**

**गोम्या** —---- प्रिय गोम

**सोम्या** —---- प्रिय सोम

**गोम्या** —---- थांब; हे पत्र माझ्या सखूचं असलं पाहिजे .ती मला प्रेमाने गोम म्हणते

**सोम्या**—---- मी ही तेच सांगणार होतो.  ती मला प्रेमाच्या भरात सोम म्हणते .

**गोम्या**—---- पण इथं गोम आहे .

**सोम्या** —----हट् तिथं सोम आहे.

**गोम्या** —---- तुझं ही राहिलं माझं ही राहिलं! प्रिय गोम सोम. चला आता पुढे वाचू. (**दोघे खालील मजकूर वाचतात**) तुम्हाला कळविण्यास अत्यंत आनंद वाटतो. (**आनंदाने एकमेकांकडे पाहतात**) की मी आमच्या शेजारी असलेल्या खुशालराव टोणपे या श्रीमंत गृहस्थाबरोबर विवाहबद्द झाले आहे!  (**प्रश्नार्थक मुद्रेने एकमेकांकडे पाहतात**)

**गोम्या** —---- विवाहबद्ध झाले आहे?

**सोन्या** —---खुशालराव टोणपे.  अं?

गोम्या:- अं? बरं पुढे काय म्हणते? दोघे वाचतात - आम्ही आमच्या लग्नानिमित्त आज सायंकाळी फिस्ट देणार आहोत! त्यावेळी आपण हजर राहून फीस्टीचा आनंद लुटावा अशी इच्छा आहे!

**सोम्या**—---- फीस्टीचा आनंद लुटावा काय?

**गोम्या** —---- आपली, सौ.सखु खुशालराव टोणपे!

**सोम्या** —---- हरे रामा! चांगला टोणपा हाणला या सखूनं आमच्या टाळक्यात ! (**कपाळावर हात मारून घेतो** )

**गोम्या**—---- ही आमच्या जीवनाशी अगदी खुशाल खेळली बरं! (**कपाळावर हात मारून घेतो**)

a

**चंदनमल्ल—----**अशे कपाळावर काय हात मारून घेते दोघेबी? नवी खोली तैयार आहे!

**सोम्या** —---- दोस्त! आता कशाला हवी नवी खोली? तुमच्या आमच्या सारख्या ब्रह्मचाऱ्यांना एक खोली पार्टनरशिप मध्ये चालेल. नाही?

**गोम्या** —---- हो न चालायला काय झालं? तेवढंच भाडंहि वाचेल! आपण यापुढे या खोलीचं निम्म निम्म भाडं देऊन राहू म्हणजे झालं!

**सोम्या**—---- छट्!आता सात महिने कुणीच भाडं द्यायला नको. दोघांच्याकडून सहा महिन्याचे डबल भाडं घेऊन चंदनमल्लनी सहा महिने अॅडव्हान्स रक्कम घेतली नाही का? या सहा महिन्याच्या अॅडव्हान्सचं व्याज म्हणजे आणखी एका महिन्याचं भाडं! मिळून सात महिन्याचा भाडं आता द्यायला नको! नव्हे का हो चंदनमल्ल?

**चंदनमल्ल—---- ( कपाळावर हात मारून )**हाय रे राम गोपाला! आमालाबी टोला बसलाच तर! अरे, आमाला तुम्ही अगदीच ठार करते!

**गोम्या** —---- नाही. अगदीच ठार करीत नाही! आज संध्याकाळी सखुबाई टोणपेच्या फिस्टला तुम्हाला बी घेऊन जाऊ! काय रे दोस्त?

**सोम्या** —---- जरूर जरूर! क्यों नहीं! चलो!

**(सोम्या गोम्या चंदनमलाच्या खांद्यावर हात टेकतात आणि तिघे निघून जातात)**

**(पडदा )**

---

**समाप्त**

**दि. २३/३/१९५६ लेखन पूर्ण.**

कल्पना —- box &cox वरून

==================================

या नाटकाचे प्रयोग करू इच्छीणाऱ्यांनी कृपया संपर्क करावा

कुमुद्वती भोसले
पत्ता - प्लॉट नंबर 15, दीप सेवक सोसायटी, आर के नगर, कोल्हापूर . महाराष्ट्र.
संपर्क – व्हॉट्स ऍप क्र. ९९७०१०३३७८
Email : bhosalekumudwati@gmail.com

==================================

ई साहित्यवर अशीच अनेक नाटके वाचा

**नाटक (esahity.com)**

**फक्त एक क्लिक करा.**

a

**कै. पांडुरंग दे. सूर्यवंशी यांचे ई साहित्यवरील या आधीचे प्रकाशित पुस्तक(नाटक)**

**फक्त एक क्लिक करताच उघडेल**

